# कलागुणांमुळेच आपला सर्वांगीण विकास - प्राचार्य मीनाक्षी वायकोळे

अनुभव व शेक्षणिक पाया पक्का असेल तर आपण सर्वगुण संपन्न व्हाल आणि टीचर ट्रेनिंग हे गरजेचे आहे .वकृत्व ,कर्तुत्व व नेतृत्व या तीन गुणांना चालना मिळते असे कार्यक्रम वर्षभर होतात त्यामुळे आपल्या कलागुणांसोबत आपला सर्वांगीण विकास होतो असे केसीईच्या शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयात आयोजीत प्रतिबिंब २०१९ स्नेहसंमेलन व विद्यार्थी गौरव समारंभात केसीईचे व्यवस्थापन परिषद सदस्या व पी.ओ.नाहटा कॉलेजच्या प्राचार्य मीनाक्षी वायकोळे यांनी विचार मांडले. यावेळी मंचावर केसीई शेक्षणिक संचालक डॉ. दिलीप हुडीवाले,प्राचार्य डॉ.अशोक



राणे,डीएड विभागप्रमुख डी.डी. भाटेवाल,प्रा.निलेश जोशी,प्रा.रंजना सोनवणे,डॉ.स्वाती चव्हाण,प्रा.अंजली बन्नापुरे ,प्रा.हेमलता चौधरी उपस्थित होत्या.

यावेळी डॉ. दिलीप हुडीवाले यांनी शिक्षक विद्यार्थ्यांचा शेक्षणिक पाया पक्का करतो .विषय सोपा करून शिकवतो त्यामुळे त्याला विषय आवडतो.आणि केसीई या बाबींचा विचार करून स्वायत्त होत असताना त्याच्या आवडत्या विषयांना घेऊन अभ्यास करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात पुढे राहील असे सांगितले.





कार्यक्रमाची सुरवात ईशस्तवन व स्वागतगीताने हर्षदा कोल्हटकर हिने केली.यानंतर विद्यार्थी प्रतिनिधी रुपाली महाजन,सुषमा पाटील व नेहा पाटील यांचा सत्कार करण्यात आला .त्यानंतर डीएड विभाग पूजा कापसे,बीपी एड कोमल पाटील व बीएड विभाग रुपाली महाजन यांनी अहवाल वाचन केले. विद्यार्थी मनोगतात तुकाराम जोगी,अखिलेश यादव व वर्षा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले . प्राचार्य डॉ.अशोक राणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले कि, विभागाच्या विद्यार्थ्यांचे १०० टक्के प्लेसमेंट होत आहे.बीपीएड उत्तीर्ण विद्यार्थी विविध

शाळेत स्पोर्ट्स शिक्षक म्हणून नियुक्त आहेत.तसेच विविध कला व क्रीडा विभागात महाविद्यालयाचे नावलौकिक निर्माण करत आहेत अशी माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रंजना सोनवणे यांनी तर आभार प्रा.साधना जोगे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वितेसाठी सर्व विद्यार्थी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.